**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र राज्यस्तरीय नवोउपक्रम स्पर्धा सन 2023-24**

**शीर्षक**

दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आनंददायी वातावरण निर्मिती.

**सादरकर्ता**

श्री. मोतीराम तुकाराम जाधव (समावेशित शिक्षण तज्ञ)

गटसाधन केंद्र पंचायत समिती मानोरा जि. वाशिम.

**प्रेरणा**

मा. श्री भानुदास पुटवाड साहेब

प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वाशिम

मार्गदर्शक

| | |
|---|---|
| श्री. विलास कडाळे | श्री अनिल पवार |
| अधिव्याख्याता जि.शि.प्र.स.वाशिम | गटशिक्षणाधिकारी प.स. मानोरा |

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा - 2023-24

### प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती मोतीराम तुकाराम जाधव हे माझ्या शाळेत/कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आनंददायी वातावरण निर्मिती. हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून तो त्यांच्या परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 20/12/2023

स्थळ : मानोरा

शाळा/कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी

नाव : अनिल पवार

शिक्का :

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी प्रतिज्ञापत्र नमुना

### प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/डॉ. मोतीराम तुकाराम जाधव प्रतिज्ञापत्र लिहून देतो/ देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आनंददायी वातावरण निर्मिती. हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 20/12/2023

स्थळ : मानोरा.

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव : मोतीराम तुकाराम जाधव

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

**नोंदणी प्रपत्र सत्र (2023-24)**

- सहभागी व्यक्तीचे नाव :- मोतीराम तुकाराम जाधव
- पद:- समावेशित शिक्षण तज्ञ
- कार्यालयाचा पत्ता :- गटसाधन केंद्र पंचायत समिती मानोरा जि. वाशिम.
- जिल्हा कार्यालय :- डायट वाशिम.
- ई-मेल:- motiramjadhav 1985@gmail.com
- संपर्क क्रमांक :- 8605293808
- शैक्षणिक व्यावसायिक अहर्ता:- BA, SPI BED(MR)
- अनुभव :- 12 वर्ष
- नवोपक्रम शीर्षक :- दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आनंददायी वातावरण निर्मिती.
- सहभागी गट क्रमांक :- 4

**अनुक्रमणिका**


| अं.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| 1 | प्रमाणपत्र | 1 |
| 2 | नोदणी | 2 |
| 3 | अनुक्रमणिका | 3 |
| 4 | शीर्षक | 4 ते 5 |
| 5 | नवोपक्रमाची गरज व महत्व | 6 |
| 6 | नवोपक्रमाचे नाविण्याता व उद्दीष्ट | 7 ते 11 |
| 7 | नवोपक्रमाचे नियोजन | 12 ते 13 |
| 8 | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 14 ते 15 |
| 9 | नवोपक्रमाची यशस्वीता | 16 ते 19 |
| 10 | समारोप | 20 |
| 11 | संदर्भ सूची व परिशिष्टे | 21 |
| 12 | उपक्रमाचे फोटो | 22 ते 24 |

**शीर्षक :- दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आनंददायी वातावरण निर्मिती.**

प्रस्तावना :-

मी वाशिम जिल्ह्यातील एक अतिमागास तालुका मानोरा येथे राहत आहे मानोरा तालुका येथे समावेशित शिक्षण (InclusiveEducation ) विभागात समावेशित शिक्षण तज्ञ म्हणून कार्यरत आहे. तालुक्यातील उमरी, विठोली, फुलउमरी केंद्रात विशेष गरजा धारक विद्यार्थ्यांना (CWSN) समावेशन करावयाचे आणि विशेष मुलांना त्यांच्या समवयस्क असणाऱ्या सर्वसामान्य मुलांसोबत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून शिक्षण देणे, हा मुख्य समावेशित शिक्षणाचा उद्देश असतो. मानोरा तालुका हा अतिमागासलेला तालुका आहे. समावेशित शिक्षणाचे या तालुक्यात पाय रुजले पाहिजे. त्याचवरोवर दिव्यांगांचे मानसिक शारीरिक आणि सर्वांगीण विकास झाला पाहिजे. या उपक्रमाच्या माध्यमातून हे दिव्यांग विद्यर्थ्यां करिता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे नवीन उपक्रम राबविले आहे.

दिव्यांग व्यक्तीचा अधिकार अधिनियम 2016 Right to Persan with DisabilityAct या अधिनियमातील प्रकरण तीन शिक्षक कलम 16 व 17 व प्रकरण सहा कलम 31 व 32 मध्ये RTE act 2009 चा संदर्भ नमूद करून विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणताही भेदभाव न करता समावेशित शिक्षणाद्वारे सर्व बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबावत नमूद आहे. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना वयाच्या 0 ते 18 वर्ष वयोगटातील विद्यार्थ्यांना मोफत व शक्तीचा शिक्षण विषयक शैक्षणिक व भौतिक सोयी सोयी सुविधा पुरविले जातात.

समावेशित शिक्षण म्हणजे सर्वांसाठीचे असे शिक्षण ज्यामध्ये सर्व विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत समान सहभागी असतील. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना समावेशित शिक्षणाची सुविधा पुरवणे आणि स्वावलंबन बनवणे या विश्वासावर आधारित आहे. सर्वांसाठी उपलब्ध असलेल्या शैक्षणिक संसाधनांचा उपक्रमाचा व कृतीचा त्यांना लाभ मिळावा व या विशेष मुलांना केवळ विशेष सेवा वर अवलंबून राहावे लागू नये. दिव्यांग विद्यार्थ्यांचे परिपूर्ण सर्वांगीण विकास व्हावे हे संकल्प समावेशित शिक्षणाचे आहे.

समावेशित उपक्रमात CWSN विद्यार्थ्यांचे भारतातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना समान दर्जा व समान संधीचा हक्क मिळाला पाहिजे व सर्वांना समान सहभाग घेऊन सर्वांना समान वर्तणूक दिली पाहिजे. व तसेच सर्व विद्यार्थ्यांसोबत विशेष बालकांना शिक्षण मिळाला पाहिजे. प्रत्येक कौशल्यात विकास झाला पाहिजे या अनुषंगाने या

विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण निर्माण करून देणे खूप गरजेचे वाटते. प्रत्येक दिव्यांग विद्यार्थी हा शाळेत दाखल झाला पाहिजे व दाखल करून नियमित शाळेत आला पाहिजे. शाळेत येऊन तो वर्गात टिकून राहिला पाहिजे तर तो विद्यार्थी भविष्यात त्यांच्या पायावर उभा राहू शकतो. हा आत्मविश्वास विद्यार्थ्याला दिला तर तो स्वावलंबन होईल. समाजात व देशात दिव्यांग विद्यार्थ्यांचे आदर्श निर्माण होईल. विद्यार्थ्यांची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून शिक्षणाशिवाय पर्याय नाही. यासाठी दिव्यांगांना भारतामध्ये लायक आणि सक्षम बनवण्याचे संकल्प समावेशित शिक्षणाच्या माध्यमातून होत आहे. या विद्यार्थ्यांना चालना मिळत आहे. म्हणुन दिव्यांग विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण मिळावे व विद्यार्थी स्वावलंब व्हावे हा माझा संकल्प आहे.

## 1) नवोउपक्रमाची गरज व महत्त्व

### * समावेशित शिक्षण *

विशेष गरजा धारक (CWSN) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी दिव्यांगानुसार शिकण्यासाठी शैक्षणिक साधने व उपकरणे गरजेनुसार देणे आवश्यकतेनुसार पुरवणे हे महत्त्वाचे आहे.

<u>शिक्षण प्रक्रियेत जी वालके समाविष्ट होतात ती वालके एकत्र राहायला शिकतात</u>

दिव्यांगांची प्रत्येक क्षेत्रात सर्वांगीण विकास झाला पाहिजे ही बाव लक्षात घेऊन व दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून बालकांना मुख्य प्रवाहात आणणे व त्यांना सन्मानाने जगता वागता आले पाहिजे, विशेष गरजा धारक दिव्यांग विद्यार्थी सहज व सुलभ शिक्षण घेऊ शकेल. दिव्यांगात्वावर मात करणे हेच मुख्य उद्देश आहे. त्याकरिता आमचे सर्वसमावेशित चे सहकारी काम करत असतात. त्या माध्यमातून गृह भेटी देत असताना अनेक प्रकारचे दिव्यांग आढळून आले आहे. मग अल्पदृष्टी, पूर्णतः अंध, कर्णवधिर, मतिमंद, सेरेवल पाल्सी, वाचादोष, सिकलसेल, बहुविकलांग, हेमोफेलिया, मस्कुलर डिस्ट्रॉफी, ऑटिझम, अस्थिव्यंग वुटकेपणा, कुष्ठरोग, एसिड अटॅक, वाचा दोस, अध्ययन अक्षम, थैलेसेमिया, मल्टिपल स्कॉलरशिस इत्यादी 21 प्रकार दिव्यांगाच्या आहेत. अशा विद्यार्थ्यांना दैनंदिन कार्य करीत असताना येणाऱ्या अडचणी खूप आहेत. दिव्यांगांचे या अडचणी दूर व्हावे या अनुषंगाने आम्ही मुले शोध मोहीम करून त्यांचे गृहभेटी व शाळा भेटी करीत असतो. यादरम्यान मला जिल्हा परिषद शिक्षक श्री गवळी सर यांच्या सांगण्यावरून कुमारी पुनम राजेश चव्हाण इयत्ता 7 वीत शिकणारी गोंडस मुलगी आढळून आले. त्यांच्या वडिलांशी संपर्क करून गृहभेटी केले व पूनमची भेट घेतली पुनम ही जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा भुली येथे शिकत आहे. आईचे नाव सीमा राजेश चव्हाण आहे. पुनम ही जन्मताच पूर्णतः अंध आहे. हसरी छानसी सुंदर मुलगी आहे. पण जन्मताच अंध असल्यामुळे पालकांनी डॉक्टरांना पण दाखवले पण तिच्यावर कोणतेही उपचार झाले नाही. डॉक्टरांनी पूनमला पाहिल्यानंतर तिला सांगितले पूनमची दृष्टी कधीच येऊ शकत नाही असे सांगण्यात आले. पुनम यांचे परिवार हे नाजूक आहे आई- वडिलांचे परिस्थिती गरिबीचे व शेतकरी आहे. व दुसऱ्यांच्या शेतात मोलमजुरी करून आपले कुटुंब चालवणारे आहे.

## 2) उपक्रमातील नाविन्यता

### ·* तिमिराकडून तेजाकडे *

कुमारी पूनम ही पूर्णतः अंध असल्यामुळे तिला कोणत्या ही विविध वस्तू खाण्याचे राहण्याचे ये-जा करणे उठणे बसणे व कोणतेही गोष्टीची परिचय नसणे हे तिच्यासमोर खूप मोठं ध्येय होतं. कारण की तिच्या जीवनामध्ये पूर्ण अंधारच होता. असाध्य मधून साध्य साध्य करण्याची एक खूप मोठा आव्हान होतं. कारण की ती काही पाहू शकत नव्हते त्यामुळे तिच्यामध्ये अनेक भीतीचे वातावरण पसरलेले होते. स्पर्श झाला किती भीत असे, ठेस लागली तर भीत असे, कोणताही आवाज आला तर भीत असे, हाताला काही लागला तर भीत असेल घरामध्ये काही आवाज आला किती भीत असे यांचा सर्व मी मुलांकन केला तेव्हा माझ्यासमोर तिचा या समस्येचा मला सर्वात मोठा आव्हान होता. या सर्व गोष्टीमुळे पूनम ला भीती वाटत होती व तिच्यामध्ये भीतीयुक्त वातावरण निर्माण झाले आहे असे मला आढळून आले. त्यामुळे ती कुठेच जाण्याचे, वसण्याचे, वोलण्याचे हिंमत करत नव्हती. हे सर्व वारंवार मला गृहभेटीदरम्यान आढळून आले. वैयक्तिक शैक्षणिक व सामाजिक कौशल्यावावत तर ती कोसो दूर होती. पूनम मधली भीती दूर करणे हे सर्वात मोठे माझे उद्दिष्ट होते? समस्या पण होती? आव्हान पण होते?.

पूनम जवळ वारंवार तिच्या संपर्कात राहून भेटी दिले. घरी जाऊन तिला बोलायचे आणि मराठी भाषेमध्ये तेवढा बोलत नव्हते. मी आणि ती वंजारा समाज असून मी वंजारा भाषेमधून वोलत होते. जेव्हा मी नवीन म्हणून वोलत होतो . तरीपण माझ्याशी भीत असे पण माझा आवाज ती ओळखत असे तुम्ही जाधव सर आहेत म्हणून ती मला ओळखत होती. मग मी तिला मजाक करायचं मग तिला बोलून शैक्षणिक कौशल्य, वैयक्तिक कौशल्य, सामाजिक कौशल्य, च्या माध्यमातून विकसित करण्यासाठी व मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कृती आराखडा तयार केला. त्याप्रमाणे अध्ययन अनुभव पूनमला देण्याचा प्रयत्न केला स्पर्श संवेदना विकसित करण्याकरिता अनेक शैली वापर करत होतो. तरीपण ती घाबरायचे अनेक वेळा ती खचून जायची. कारण श्रवण म्हणजे ऐकण्याची क्षमता तिच्याजवळ होती पण ती कोणत्याही गोष्टीला भीत असे गृहभेटी करून मी पण खूप प्रयत्न करत होतो. किती दिवसापासून प्रयत्न करून सुद्धा ती तिच्या मनात भीती ठेवायची. मी तिचा घावरट स्वभाव दूर करण्यासाठीखूप प्रयत्नशील होतो. कारण की दिव्यांग विद्यार्थी स्वावलंवन व सर्वांगीण

विकास व्हावा हे माझे स्वप्न होते. अनेक प्रोत्साहन देऊन मी पाहिले त्याच्या मनातील भीती काढण्याचा भरपूर प्रयत्न करत होतो पण तिच्या मनात भीतीच राहायची.

<u>" प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे "</u>

या म्हणीचा अर्थ अंगीकारून मी स्वतः मेहनत करीत राहिलो. त्याचप्रमाणे तिला फोनवर संवाद साधला संपर्क साधत होते नेहमी भेटणे शाळेत बोलावणे, मित्र जोडणे, अशाप्रकारे तिच्याशी मी मैत्री केली हातात हात देऊन तिला आपलसं बनवलं. गुड मॉर्निंग करणे, हातात हात मिळवणे, खाण्यापिण्याच्या गोष्टी करणे गोष्टी करणे हसणे मजाक करणे आणि तिला श्रवण असल्यामुळे तिला गाणे म्हणायला सांगत होतो. आणि तिला गाणे ऐकण्याची व गाणे म्हणण्याची सवय होती.

माझ्या मोबाईल वरून पूनमला गाणे ऐकवायला देत होतो. मग तिला मी प्रोत्साहन देत होतो. मग ती गाऊन दाखवणे तिच्याजवळ मजाक करणे याच्या माध्यमातून मी जवळीक साधत होतो. सर्व सकाळी उठल्यापासून ते झोपेपर्यंत काम काय करते ते त्या समस्यावर समाधान करणे मी पूनमला माझ्यासोबत शेअर करत असे मग मी तिच्यासोबत मित्रासारखी राहू लागलो. वागू लागलो. मग मी फोनवर बोलणे तिच्या शेजाऱ्याच्या सोवत मी तिला मैत्री करून दिली शाळेत मैत्री करून दिली वर्ग शिक्षकांची मैत्री करून दिली हे सर्व विद्यार्थ्यांना तिच्यासोबत प्रोत्साहन मिळवायचे व तिला एक चांगलं मुली सोवत आपुलकी निर्माण करून दिली वैष्णवी, सीमा, आरुषी, तिच्याशी मैत्री करून दिली आणि ती मुली पण तिच्या सोबत छान राहायचे. आणि यात तिला प्रोत्साहन भेटत होते. आणि यामध्ये तिला स्वतःला आनंद वाटत होते. आत्मविश्वास निर्माण करून दिला.

तिच्या हातात हात मिळून पूनमला मैत्रीण वोलवायची मग पूनमची मैत्रीण वाढत गेले. सर्व तिला पूनम पूनम असे बोलवायचे सोबत बोलायचे हसायचे असे करता करता तिचे मनोवल वाढत गेले तिची हिम्मत वाढली आणि ती सर्वांसोबत वावरू लागली. आणि अशा परिस्थितीमध्ये आज दोन महिन्यानंतर ती मैत्रिणीशी बोलते शाळेत थोडेफार बोलत आहे. म्हणून मला वाटते की दिव्यांग कोणते असू द्या तिला मदत केली व आपलंसं केलं तर निश्चित तिला एक जगण्याचे हिम्मत येत असते. तिला नवीन दिशा मिळते. आणि दिव्यांग विद्यार्थ्यांना सुद्धा सर्वसामान्य मुलांसोवत वागू शकते म्हणून मी नवोउपक्रमामध्ये हा विषयाची निवड केली आहे मला हा विषय निवडताना खूप आनंद निर्माण झाला.

## दिव्यांग वावतची नवीन संकल्पना

1. दिव्यांग मुलांना सुविधा उपलब्ध करून देणे.
2 दिव्यांग मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे.
3. दिव्यांग मुलांचे एकात्मिकरण करणे.
4. दिव्यांग मुलांना स्वावलंबी बनवणे.
5. दिव्यांग विद्यार्थ्यांना समान संधी व सामाजिक न्याय मिळवून देणे.
6. दिव्यांग विद्यार्थ्यांना सहकाराची भावना निर्माण करून देणे.

· **दिव्यांग करिता विशेष साधने व शैक्षणिक साधने**

1. अंध मुलांसाठी गणिताची साधनेमध्ये टेलर गणित पाटी, अबॅकस या साधनांचा अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक साधनांचा योग्य वापर करतात.

अ) ब्रेल लेखन पार्टी व कलम पाटीवर अंध मुले ब्रेलमध्ये लिहितात.

व) 6 टिवांची लिपी असते उजवीकडून डावीकडे लिहिली जाते टोकदार कलमांचा उपयोग केला जातो.

क) टेलर फ्रेम अंकगणिताच्या सर्व क्रिया करण्यासाठी वापरली जाते खेड्यांचा वापर केला जातो.

इ) अबॅकस एक मन्याची पाटी असून गणितीय क्रियांची उत्तरे कॅल्क्युलेटर प्रमाणे लवकर काढता येते.

ई) बोलका संगणक या संगणकावर लिहीत असताना ते वाचले जाते.

फ) अंधासाठी पांढरी काठी ही गतिशीलता व चलनवलनासाठी या काठीचा उपयोग करता येतो.

प) ब्रेल घड्याळ यामध्ये वेळ दर्शवली जाते मूलस्पर्शाने बघते वोलकी घड्याळे पण उपलब्ध आहेत.

## 3) <u>नवोउपक्रमाची उद्दिष्टे</u>

**1. दिव्यांग विद्यार्थ्यांना सक्षम वनविणे.**

अल्प दृष्टी असणाऱ्या विद्यार्थ्यांना दृष्टी सुधारण्यासाठी चष्मा वापरूनही बऱ्याच प्रमाणात दृष्टी वाधित असेल तर वालकांना दृष्टी दोष असलेले वालके म्हणून समावेश करावा लागेल प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या दृश्य दोषाचा प्रकार व तिव्रतेतून अध्यापन अध्ययन प्रक्रियेशी व अध्ययन साहित्याची कदाचित जुळवून घ्यावे लागेल तर दिव्यांग विद्यार्थ्यांना आपण मुख्य प्रवाहात आणू शकतो.

**2) मूल्यमापन (Assessment)**

विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे संपादन व वर्गातील कृती जाणून घेण्यासाठी केलेले माहितीचे संकलन व मूल्यांकन हे आकारिक किंवा नैदानिक स्वरूपाचे असावे.

**3. एकत्रीकरण (Consolidation)**

एकत्रीकरण म्हणजे विशेष गरजा असल्याने विद्यार्थ्यांना नेहमीच्या वर्गामध्ये शिक्षणाच्या सुविधा देणे. अक्षमता असणाऱ्या बालकांचा समावेश नेहमीच्या वर्गात करत असताना वालक त्या वर्गात सामावले जाते.

**4. मुल्यांकन (Evaluation)**

श्रेणी किंवा गुण दिलेल्या संपादनांचे मूल्य निर्धारण करणे म्हणजे मूल्यमापन होय. मूल्यांकन हे गुणवत्तेच्या स्तरांचे प्रत्यक्ष मोजमाप असते.

**5. अनुकूलन (Adaptation)**

अध्ययन अध्यापनाचे हेतू साध्य होण्याकरिता विद्यार्थ्यांच्या गरजांची पूर्तता होऊन, वर्गात वातावरण, अभ्यासक्रम, साहित्य आणि मूल्यांकन मध्ये केलेल्या बदल म्हणजे अनुकूलन होय.

**6. सुधार ( Modification)**

अध्ययनाचे हेतू, अध्यापनाची क्रिया, स्वाध्याय, विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या गरजेनुसार मूल्यांकनात बदल घडवून आणणे. शब्द कार्ड, मूर्त अमूर्त, प्रत्यक्ष अनुभव, नंवर कार्ड, ध्वनी, चव आवड निवड ई.करता येतो.

यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना सुलभ व सहज शिकण्याची संधी मिळते. प्रत्येक दिव्यांगांना प्रोत्साहन देऊन शैक्षणिक कौशल्य, वैयक्तिक कौशल्य, सामाजिक कौशल्य, मनोरंजनात्मक कौशल्या च्या माध्यमातून विद्यार्थी सकारात्मक बाबी घेऊन त्यांचा संपूर्ण सर्वांगीण विकास होईल.

## आयुष्यात शारीरिक दिव्यांगापेक्षा विचारांचा दिव्यांगत्व अधिक धोकादायक ठरत

**फिजिओथेरपी (Physiotherapy)**

बहुविकलांग, अस्थिव्यग, सेरेवलपाल्सी, मस्कुलर डिस्ट्रॉफी अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना आमच्या तालुक्यात जवळपास 35 विद्यार्थी आहेत. परंतु या विद्यार्थ्यांना काही प्रमाणात अस्थिव्यंग विद्यार्थ्यांचे युद्धयांक चांगले आहे. पण चालणे, उठणे, बसणे, हाताने जड वस्तू उचलणे हे अवघड आहे हाता, पायात कमरेत ताठरपणा आहेत. आरती लांडे, हिमांशु, आकाश, मृण्मयी चव्हाण, रुद्र राठोड, गौरी खोडके, विद्यार्थ्यांना मी गरजेनुसार शारीरिक व्यायाम देऊन त्यांना सहज चालता येईल असे वॉल थेरेपी, सायकलींग, एक्युपंचर थेरेपी, चालणे, असे वेगवेगळ्या शारीरिक व्यायाम घेण्यात आले. तीन ते चार महिन्यानंतर त्यांना हातापायात, कवरेत, बराच पैकी बदल झाला. दिव्यांग विद्यार्थी स्वतः न बसणारे ते बसायला सुरुवात केली. चालताना पाय घासणारे आज ते पाय उचलून सहारा घेऊन चालत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातूनच आम्ही विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे फिजिओथेरपी देऊ शकलो.

- **<u>पालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.</u>**

पालकांना पण मुलाबद्दल आत्मविश्वास निर्माण झाला की माझा मुलगा माझी मुलगी चालू शकते शिकू शकते दिव्यांगांमध्ये पालकात सकारात्मक भूमिका तयार झाली. फिजिओथेरपी मुळे बहु विकलांग व सेरेबल पाल्सी, अस्थिव्यग विद्यार्थ्यांमध्ये बदल होतो हे निश्चित आम्हाला आढळून आले आहे. OT,PT.ST च्या माध्यमातून दिव्यांगांमध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण होते. या विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक व मानसिक बदल होते.

- **<u>दिव्यांगांना चालना मिळते.</u>**

दिव्यांगावावत समाजामध्ये व देशांमध्ये पाहण्याचा दृष्टिकोन व जीवन जगण्यासाठी नवीन ऊर्जा मिळते. प्रोत्साहन दिव्यांगांना नवीन दिशा मिळते.

- **विद्यार्थी, पालक व वर्ग शिक्षकांचा आत्मविश्वास वाढविणे,**

समावेशित शिक्षणाच्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून विशेष गरजा धारक विद्यार्थ्यांना शिकण्याची नवीन संधी मिळते. विविध उपक्रम राबवल्यास अध्ययन अध्यापन पद्धती त एक उत्तेजना मिळते. विद्यार्थ्यांमधील पालकांमधील भीती दूर होईल अनेक समस्या आहेत ते दूर होईल. विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे समस्याचे समाधान समावेशित शिक्षण घ्या उपक्रमातून होईल दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळेल.

विद्यार्थी व शिक्षक यात चांगली आंतरक्रिया होईल व मैत्री होऊन दिव्यांग विद्यार्थ्यांनाच नाहीत तर सर्वसामान्य विद्यार्थ्यांना एक नवीन दिशा व शिकण्याची संधी सर्वांना प्राप्त होईल.

" सहानुभूती नव्हे विश्वास देऊया, प्रत्येक दिव्यांगाला आपुलकीची साथ देऊया. "

4) **<u>नवोउपक्रमाचे नियोजन व कार्यवाही</u>**

- **नवोउपक्रम संबंधित तज्ञ व व्यक्तीशी तज्ञाशी चर्चा.**

दिव्यांग विद्यार्थ्यांबावत नवीन उपक्रम राबविणे करिता कु. दारोकर मॅडम, कु. इंगळे मॅडम यांच्याशी चर्चा करून दिव्यांगांमध्ये अध्ययन अध्यापन करिता येणारे अडचणी व समस्या यावावत चर्चा करण्यात आली. आणि आमच्या स्तरावर समावेशीत शिक्षणाचे आम्ही सर्व सहकारी श्री उमेश कटके, श्री. राजेश भांबुरकर, श्री. शेख इस्माईल हे सर्व समावेशित तज्ञाची चर्चा झाली. श्री धनराज मेहेल्डे साधन व्यक्ती यांच्याशी चर्चा करून प्रत्येक दिव्यांगांना भीती मुक्त वातावरण तयार करून अध्ययन अनुभव देऊन त्यांच्यावर विद्यार्थ्यांना सकारात्मक वाटचालीकडे घेऊन जाणे ही संकल्पना हातात मी घेतली आहे.

- **गृहभेटी**

प्रत्येक दिव्यांग विद्यार्थ्यांना व देशातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना पण शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्याशी मैत्री करणे, संवाद साधने, प्रोत्साहन देणे, आवड निवड जाणून घेणे, व्यवहार साधने, वागणूक, खेळ, नातेसंबंध कसे आहेत आई-वडिलांशी संबंध कसे आहेत. मोठ्यांशी संबंध कसे आहे. जाणून घेणे सर्वात महत्त्वाचे आहे. जन्मापासून ते वर्गमित्रांशी मैत्री ते आजपर्यंत संपूर्ण माहिती घेऊन त्याला संपूर्ण कौशल्यावर मूल्यमापन करून दिव्यांना वाव देणे. गृह भेटी देऊन शाळेपर्यंत व मित्रासोबत खेळणे राहणे वर्गात वसणे सोपे करणे हे दिव्यांग विद्यार्थ्यांची नवी दिशा आणि सकारात्मक भूमिका तयार करणे हे सर्वात महत्त्वाचे आहे.

**नियोजन**

उपक्रमाला अनुसरून खालील प्रमाणे नियोजन करण्यात आले आहे

| उपक्रमकालावधी | **दिनांक** | **कालावधी** | **केलेले कार्य** |
|---|---|---|---|
| **2 जुलै ते 2 नोव्हेंबर 2023** | **2 जुलै ते 14 जुलै** | **12 दिवस** | **पूर्व चाचणी** |
| | **15 जुलै ते 25 जुलै** | **10 दिवस** | **गृहभेटी, पालक समुपदेशन, विद्यार्थी भेटी, विद्यार्थ्यांची समस्या जाणून घेणे निरीक्षण करणे** |
| | **26 जुलै ते नोव्हेंबर 2023** | **95 दिवस** | **दृष्टीतिक्षणता व दृष्टीक्षेत्र या घटकांचा विचार केला जातो. ध्वनी, कार्ड, चित्र, मौखिक, स्मरणशक्ती, विविध साहित्य साधने.. दृश्प, श्राव्य स्पर्श, बहुअध्ययन शैली, गंध शैलीचा वापर केला जातो. व फिजिथेरापी चा शारीरिक व्यायाम वालचलन प्रक्रिया करण्यात येते.** |

**नवोपक्रमाची कार्यपद्धती**

**अंध व्यक्तीला ज्ञान मिळवण्यासाठी श्रवण या ज्ञान शक्तीवर अवलंबून राहावे लागते या व्यक्ती ब्रेल लिपीचा वापर करून शिकू शकते. पूर्णतः अंध विद्यार्थ्यांचा समावेश करावे लागेल. विद्यार्थ्यांचे स्वरूप व तीव्रता बालकानुसार वेगवेगळी असते. म्हणूनच दृष्टी दोष असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या प्रकार व तीव्र तेनुसार अध्यापन अध्ययन प्रक्रियेशी व अध्ययन साहित्याशी कदाचित जुळवून घ्यावे लागेल.**

| अं क्र | साहित्यांची नावे | विद्यार्थ्याला होणारा उपयोग | कौशल्य | तंत्रे |
|---|---|---|---|---|
| 1 | बोलणारी पुस्तके | ऐकून शिकणे, तोंडी शिकणे. | बौद्धिक विकास, ज्ञानमिळणे, वातावरणाचा अभ्यास, स्वतःचे वाचन, वैयक्तिक, सामाजिक, शैक्षणिक कौशल्य, मनोरंजनात्मक कौशल्य, **Dailyliving skill developme nt.** | प्रोत्साहन तंत्र, आधार तंत्र, मॉडेलिंग तंत्र, सामान्यी क्रम नकाशे, मोबाईल. स्पर्श तंत्र |
| 2 | काळया चष्मा चा वापर. | डोळ्यावर होणारा परिणाम टाळता येतो. | | |
| 3 | मनीमाळ अबॅकस | संख्यांची बेरीज, अंक ओळख, नोटांची ओळख, नाणी ओळख. | | |
| 4 | पांढरी काठी | हलन चलन करणे, व्यवस्थित रित्या चालणे. | | |
| 5 | नकाशा वाचन, आलेख आकृत्या, चित्रे, चिन्हे | वर्णनात्मक व दृक स्पष्टीकरण, दिशादर्शक माहिती, गणिती अभ्यास. | | |
| 6 | हवामान, वनस्पती, वन्यसृष्टी | पर्यावरण व वातावरण बद्दल माहिती.7. खरवड, मऊ, कडक वस्तू, नरम जाणीव करून देणे, जड वस्तू, हलकी वस्तू. | | |
| 7 | स्पर्श खेळणे | मोबाईल, दूरदर्शन, ज्ञान वाढवणे संदर्भ गोष्टी माहिती. | | |
| 8 | कथा गोष्टी | ब्रश करणे, आंघोळ करणे, कपडे घालने, तेल पावडर करणे. | | |
| 9 | दैनंदिन चे वैयक्तिक कामे. | मीठ, साखर, गूळ, मोहरी, डाळ, लिंबू ,फळ, तिखट, आंबट, कडू, सुगंध, आणि चव इत्यादी. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **10** | **गंध, वास, चव** | **गाणे ऐकणे, म्हणून दाखवणे, पाढे, कथा काल्पनिक, गोष्टी, पेटी, वाजवणे, आवाज, पक्षी, प्राणी वेगवेगळया आवाज जाणीव फरक करून देणे.** | . | |
| **11** | **श्राव्य बहु अध्ययन** | **ऐकून शिकणे, तोंडी शिकणे.** | | |

**"सामान्य मुलाबरोबर दिव्यांग मुलांना शिक्षणात समाविष्ट करून त्यांना शिक्षण देणे या योजनेला दिव्यांग एकात्म शिक्षण योजना असे म्हणतात. "**

- **प्रत्यक्ष कार्यवाही**

दिव्यांग विद्यार्थ्यांना समाजाचा उपयुक्त घटक बनवण्यासाठी शिक्षणातून होणारा विकास शाळेतच होईल. मुलांमध्ये अपेक्षित सामाजिक, भावनिक, शारीरिक बदल योग्य रीतीने होतो की नाही यांचा पाठपुरावा शिक्षक व पालक यांच्या मदतीने करावा. दिव्यांग म्हणजे निरुपयोगी, अपूर्ण, दुर्बल समाजाचा भार हे समाज खरे नसून तो समाजाचा उपयुक्त घटक आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या समर्थ व स्वावलंबी वनवण्यासाठी काम करणे. विशेष गरजा धारक विद्यार्थ्यांमध्ये कार्य करत असताना त्यांच्या अडचणी व त्यांच्या समस्या मी जवळून पाहिले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी समावेशित शिक्षण विभागातील सर्व कर्मचारी काम करीत असतात. आणि प्रत्येक क्षेत्रात तो नवीन काहीतरी शिकायला पाहिजे. ही संधी खूप मोठी असते. समाजातील व इतर लोकांनी पण पुढाकार दिव्यांगा करिता कामे करण्याची इच्छा दाखवली पाहिजे.

- **अंधाचे शिक्षण**

सामान्य विद्यार्थी सर्वसामान्यपणे ज्ञान हे पंच ज्ञानेंद्रिय मार्फत घेतो. त्यामध्ये डोळा हे महत्त्वाचे ज्ञानेन्द्रिय आहे. त्या मार्फत 80 टक्के ज्ञान आपण मिळवीत असतो. सामान्य शाळेत शिकण्यासाठी फळा हे प्रभावी माध्यम असते विद्यार्थी फळ्यावरील पाहून ज्ञान मिळवितात. अंध विद्यार्थ्यांना मात्र हेच ज्ञान मिळवण्यासाठी शाब्दिक वर्णनाची व शैक्षणिक साधनांची जोड द्यावी लागते. दोन प्रकार आहेत.

1. पूर्ण अंधत्व यामध्ये दृष्टीचा अभाव दोन्ही डोळ्यांनी न दिसणे.
2. मंद दृष्टी व अंशतः अंध या फरकानुसार शिक्षक आपल्या शिकवण्याच्या पद्धती बदल करू शकतात.

कुमारी पूनम ही विद्यार्थिनी पूर्ण अंधत्व आणि इयत्ता पाचवी शिकणारी विद्यार्थिनी आहे. मनात नेहमी घाबराट पणाने राहत होती म्हणून मी येणाऱ्या सर्वसामान्य पण विद्यार्थी घाबरत असतात. आणि प्रत्येक विद्यार्थ्यांची भीतीदायक वातावरणात वावरत असतात. यांचा विचार करत मी, दिव्यांगा करिता भयमुक्त वातावरण निर्मिती तयार करणे. हा उपक्रम हाती घेण्याचा संकल्प केला. हा उपक्रम सामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांना सुद्धा कामी येणारे उपयुक्त आहे. यासाठी २ जुलै ते ३ नोव्हेंबर या कालावधीत करिता नियोजन केले. गृहभेटी करून शाळेपर्यंत पोहोचविण्याचे काम कुमारी पूनमला केले

आज पुनम तिच्या मैत्रिणी सोबत पालकांसोवत न भिता प्रत्यक्ष जात असते. आज ती स्वतः समाजात शाळेत, शिक्षकासोबत संवाद साधते बोलते. मनमोकळेपणाने

वागण्याचा काम ती करते. पा वातावरणामुळे आज देशामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी पूर्णतः अंध विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात नोकरीला आहेत कलेक्टर पण आहेत.

समावेशित शिक्षण विभागाच्या माध्यमातून पूनमला मदतनीस भत्ता व प्रोत्साहन भत्ता मिळत आहे. समावेशित शिक्षण विभागा कडून विशेष तज्ञांची व विशेष शिक्षकांचे समुपदेशन व शाळेतील शिक्षकांचे नियमित मार्गदर्शन व मदत होत आहे. त्यामुळे पूनमला आत्मविश्वास निर्माण झाला व त्याच्या माध्यमातून एक नवीन संधी प्राप्त झाली आहे.

**6) नवोपकर्माची यशस्वीता**

नवोउपक्रम राबविल्यामुळे सर्वसामान्य व दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये पण खालील प्रमाणे बदल दिसून येतात. त्यामुळे हे उपक्रम सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी पण व देशातील प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी एक नवीन उत्तेजना मिळण्यासाठी व विद्यार्थ्यांना सकारात्मक व स्वावलंबन बनण्यासाठी खूप चांगल्या प्रकारे उपयोगी उपक्रम आहे. भविष्यात पण हा उपक्रम लाभदायक ठरेल हे मला वाटते.

1. या उपक्रमाच्या माध्यमातून दिव्यांगच विद्यार्थी नाहीतर सर्वसामान्य विद्यार्थ्यांना स्वत बद्दल व दुसऱ्या बद्दलची जी भीती असते ती दूर होते.

2. दिव्यांग विद्यार्थी स्वावलंबी बनतो, आपल्या दैनंदिन क्रिया तो स्वतः करत आहे.

3. विद्यार्थ्यांमध्ये हिन भावना दूर झाले. सर्व मिळून मिसळून राहण्याची सवय लागली.

4. पुनम मध्ये बदल झाला की ती स्वतः सपोर्ट देऊन चालते व मदत दिल्यावर प्रतिक्रिया देत आहे.

5. या उपक्रमाने पालकांमधील निराशा दूर होते व समाजातील व्यक्तींचा पाहण्याचा दृष्टिकोनात बदल झालेला दिसून येतो.

6. पूनमच्या दैनंदिन क्रिया वैयक्तिक कौशल्यामध्ये स्वतःचे काम काही प्रमाणात करीत आहे. जसे ब्रश करणे, आंघोळ करणे, कपडे घालने केस विंचरणे पावडर लावणे व काही प्रमाणात जेवण स्वतः करणे बोलणे इत्यादी.

7. या उपक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक कौशल्पात अंक, संख्या, शब्द, प्राणी फळांची, वनस्पती. हलके जड वस्तूंची नावे व आकार व ज्ञान आकलन होत आहे.

8. शैक्षणिक साहित्य साधने कसे वापर करायचे आहे स्पर्श स्वरूपात मॉडिफिकेशन च्या साह्याने पेन्सिल हातात धरून रेषा स्वरूपात लिहिण्याचे व मोजमाप कसे करावे ही माहिती झाली.

9. घरगुती साहित्य व आवड निवड, कडू, गोड व सुगंध, चव ही माहिती झाले आहे.

10. या उपक्रमा अंतर्गत स्वतःमध्ये भरपूर बदल झाले. घावरणे, चिडचिडपणा करणे हे बंद झाले. सकारात्मक गोष्टी चा ज्ञान मिळाला व स्वतःमध्ये हिम्मत आली.

या उपक्रमाची यशस्वी होण्यासाठी आपल्या लक्षात येते की आपल्या ठरवल्यानुसार उपक्रमाची यशस्विता आपल्याला सांगता येईल. या उपक्रमातुन विद्यार्थी, मित्र, पालक, वर्गशिक्षक व समाजातील सर्व लोकांचा चांगली प्रतिक्रिया मिळाली. सहवास मिळाला चांगले अनुभव मिळाले. सर्वांचा आत्मविश्वास वाढवता आला. सर्वच विद्यार्थ्यांना या उपक्रमाच्या माध्यमातून येणाऱ्या सर्व बालकांना समाजात व देशाला उपयोगी पडणारे उपक्रम हे सर्वोत्तम उपक्रम आहे.

- **साध्य काय झाले?**

1. दिव्यांग विद्यार्थ्यां करीता आनंददायी वातावरण निर्मिती झाली.

- **पालक**
-

1. पालकांची दिव्यांग याची भीती दूर झाली.
2. आई वडिलांना आत्मविश्वास निर्माण झाला.
3. पुनम कुठे पडेल किंवा ठेच लागेल व घावरेल ही समस्या दूर झाली.
4. दैनंदिन जीवनात पुढे स्वतःचे कामे करेल हा विश्वास निर्माण झाला.

- **विद्यार्थी**

1. पुनम स्वतः म्हणते की मी स्पर्शाने व एखाद्या वस्तूच्या सहाय्याने मी चालु शकेल.
2. माझे वैयक्तिक काम मी स्वतः करायला शिकत आहे.
3. आता सध्या माझे मैत्रीण वैशाली, सोनू व माझी बहीण यांच्यासोवत मी खेळू शकेल. उदा-गाण्याच्या भेंड्या, वस्तू ओळखणे इत्यादी
4. पुनम म्हणते की मी मोठी झाल्यावर गायन करेल.

- **फिजिओथेरपी चे फायदे**

1. उठून बसण्याची जिद्द निर्माण झाली.
2. हाताचे व पायाचे ताठरपणा कमी झालात्यामध्ये लवचिकता आली हलनचलन करण्यास सोपे झाले.
3. स्नायूचे व शारीरिक व्यायाम घरी पण करू शकतात.

**<u>समारोप</u>**

समग्र शिक्षा, समावेशित शिक्षण अंतर्गत विशेष गरजा धारक (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे सर्वांगीण विकास करणे आज काळात सोपे झाले आहे. समावेशित शिक्षणाची संकल्पना 1960 मध्ये बऱ्याच देशातून अस्तित्वात आली. 1981 च्या आंतरराष्ट्रीय दिव्यांग वर्षापासून या संकल्पनेस त्यांना मिळून प्रसार प्रचार झाले. 1990 मध्ये जागतिक स्तरावरील परिषद थायलंड मधील जोमथियम येथे झाली. या परिषदेत समावेशित शिक्षणाची गरज या विषयावर चर्चा केली व संकल्पना जागतिक स्तरावर मांडण्यात आली. 1994 मध्ये भारतासह 92 देश व 25 जागतिक संघटनांनी हा विचार केला व संकल्पना मान्य झाली.

समग्र शिक्षा अंतर्गत समावेशित शिक्षण हे सर्वांसाठीचे असे शिक्षण ज्यामध्ये सर्व विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत समान सहभागी होतील. विशेष वालकांना सर्व शैक्षणिक व भौतिक साहित्य साधने व सुविधा पुरवणे हे या विश्वासावर आधारित आहे. सर्व भारतीयांना समान दर्जा व समान संधीचा हक्क मिळाला पाहिजे सर्वाना समान सहभाग घेऊन सर्वांना समान वर्तणूक दिली पाहिजे. या अनुषंगाने जास्तीत जास्त दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहामध्ये आणता येईल या दृष्टीने समाज आणि पालकांमध्ये व शिक्षकांमध्ये संपर्क वाढविला व गृहभेटी करून जास्तीत जास्त जवळीक साधली आणि पालकांचे समुपदेशन केले, पालक प्रशिक्षण केंद्र परिषद, पालक सभा, मासिक सभा, शाळा व्यवस्थापन समिती या सभेमध्ये दिव्यांग विषयी जनजागृती केली आहे. विद्यार्थ्यांचे निरीक्षण करून त्यावर तिचे व्यवहार काय करते? ती काय करू शकत नाही? कशाची गरज आहे? समस्या काय आहे? यावर निरीक्षण करून मूल्यांकन केले आहे. पालकांना मार्गदर्शन करून त्या वावीवर आराखडा तयार करून या कामास सुरुवात केली.

खरोखरच निश्चितकेलेल्या कामाचे समाधान मला मिळाले. आज मी दिव्यांगांचे पालकांचा सहभाग घेऊन गरजेनुसार समुपदेशन करून विद्यार्थी, पालक वर्गशिक्षक यांना सोबत घेऊन सकारात्मक भूमिका घेतली. विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणायचे स्वप्न पूर्ण झाले आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात पण विद्यार्थी शिकला पाहिजे स्वावलंबी झाला पाहिजे आपला देश यावावतीत प्रगत झाला पाहिजे.या संकल्पना घेऊन आमची सर्व टीम काम करीत आहे. यापुढे पण असेच कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन सुरूवात केले आहे.

या उपक्रमातून या विषयाला खरोखर न्याय मिळाला असे मला वाटते. एक प्रेरणा मला मिळाली व प्रोत्साहन मिळाले प्रत्येक शाळेतल्या दिव्यांगना नवीन काहीतरी शिकण्याची संधी मिळाली आहे. या कामाचा समाधान म्हणून मला खूप चांगले वाटले.

**<u>"दिव्यांगांचा सन्मान, हाच आमचा अभिमान."</u>**

- **<u>संदर्भ</u>**

**<u>1. विशेष गरजा असलेल्या बालकांचे समावेशन.</u>**

**2. अध्ययन निष्पत्ती प्राथमिक स्तर.**


**3. समावेशित शिक्षण, प्राथमिक शिक्षकासाठी हस्तपुस्तिका.**

**4. राष्ट्रीय मानसिक विकलांग संस्थान, सिकंदराबाद.**

**(विशेष शिक्षा कार्यात्मक विश्लेषण जाचसूची.)**

**5. समावेशन व शिग्रहस्तक्षेप (समावेशन )**

*** परिशिष्टे**



समावेशित शिक्षण, नवोपक्रम गट साधन केंद्र प. स. मानोरा,

विद्यार्थीनीचे नाव - कु. पुनम राजेश चव्हाण वर्ग 7 वा - पूर्णतः अंध मुल्यमापन (कृती) 2023-24

| अ. क्र | कौशल्य | केलेल्या कार्य संख्या | सुरवातीचे स्तर | पहिला टप्पा सत्र I % | दुसरा टप्पा सत्र II % | तिसरा टप्पा सत्र III % |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैयक्तिक कौशल्य | 15 पैकी 9 | हलन - चलन हावभाव, दैनंदिन बोलत नव्हते नविन व्यक्ती. | गृहभेटी 10% | अध्ययन 20% | निष्पण 55% वैयक्तिक वर्तन बदल |
| 2 | शैक्षणिक कौशल्य | 15 पैकी 6 | स्पर्श, आव्य चव, सुगंध अंक, संख्या, नोट. | गृहभेटी 10% | अध्ययन 20% | निष्पण 50% बहुअध्ययन ब्रेल लिपी, ज्ञान |
| 3 | सामाजिक कौशल्य | 15 पैकी 6 | Good morning नाते, संबंध मैत्री, | गृहभेटी 10% | अध्ययन 20% | निष्पण 50% ओळख, ज्ञान |
| 4 | मनोरंजनात्मक कौशल्य | 15 पैकी 4 | गायन, गाणे म्हणणे, कथा पक्षी, प्राणी आवाज, मोबाईल. | गृहभेटी 15% | अध्ययन 25% | निष्पण 60% खेळ, ध्वनी, स्पर्श |

समावेशित शिक्षण तज्ज्ञ (IED) बि.आर.सी.पं.स. मानोरा

समावेशित शिक्षण तज्ज्ञ (IED) बि.आर.सी.पं.स. मानोरा

गट शिक्षणाधिकारी पं.स. मानोरा, जि.वाशिम

**कु. पुनम, गृहभेटी दरम्यान काढलेले छायाचित्रं.**











**सर्वसामान्य विद्यार्थ्यांसोबत अध्ययनअध्यापनकरत असताना वर्गातील छायाचित्र**











**फिजिओथेरपी देत असताना चे छायाचित्र**











**"दिव्यांगांचा सन्मान, हाच आमचा अभिमान."**

**धन्यवाद्**

**श्री. मोतीराम तुकाराम जाधव**
**समावेशित शिक्षण तज्ज्ञ**
**गट साधन केंद्र, पंचायत समिती, मानोरा**